



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ



Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : २४४ वा शनिवार दि २२ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये






# सौ.अर्पिताताईंच्या रूपाने बुलढाणा नगर परिषदेवर भाजपचे कमळ फुलणार-- माजी मंत्री आ.संजय कुटे







## बुलढाणा शहरात संपन्न झाली भाजपची विजय संकल्प यात्रा व युतीचा महामेळावा...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) व रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) या मित्रपक्षांच्या वतीने बुलढाणा शहरातून भाजपा व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. अर्पिताताई विजयराज शिंदे व मित्र पक्षांच्या प्रचारार्थ दि २१ नोव्हेंबर २०२५ रोजी विजय संकल्प यात्रा व स्थानिक गर्दे हॉल येथे भाजपा मित्र पक्षाचा मेळावा संपन्न झाला. या रॅली व मेळाव्यास भाजपा माजी मंत्री आ.संजय कुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. पायी रॅलीमध्ये जमलेल्या मोठ्या जमावाने संपूर्ण शहर दणाणून गेली होती रॅलीमध्ये तिन्ही पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतलेला होता. या विजय संकल्प यात्रेने भारतीय जनता पक्षाचे शहरातील वातावरण हे अधिक मजबूत झाले आहे. भाजप कार्यालय शिवालयापासून, संगम चौक, जयस्तंभ चौक,



जनता चौक, ते गर्दे हॉल येथे समाप्त करून गर्दे हॉल येथे युतीचा मेळावा संपन्न झाला. यावेळी माजी मंत्री आ. संजय कुटे यांनी तिन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांशी व कार्यकर्त्यांशी मेळाव्यातून संवाद साधला. ङ्ङ भारतीय जनता पक्षाची मोठी ताकद बुलढाणा शहरांमध्ये असून केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील देवेंद्रजींच्या सरकारने जनकल्याणाची जी विकास कामे केलेली आहे त्यामुळे जनतेचा विश्वास भाजपने जिंकला असून आज संपन्न झालेली रॅली ही भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी आहे. तिन्ही पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सौ अर्पिताताई यांच्या विजयाचे साक्षीदार होण्यासाठी व सर्व मित्र पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी नागरिकांना मतरुपी आशीर्वाद मागावे, व विजयाचे शिल्पकार व्हावे असे आवाहन केले आहे. या मेळाव्यास रिपाई आठवले पक्षाचे जिल्हाध्यक्ष भाई दिलीप खरात यांनीही आपल्या खोचक शब्दांमध्ये बुलढाणा नगर परिषदेच्या सत्ताधाऱ्यांवर तीव्र शब्दात टीका करून ङ्ङ स्वतःचा व कुटुंबाचा विकास करणाऱ्यांना नगरपालिकेतून हद्दपार करा व सौ अर्पिताताई शिंदे व सर्व उमेदवारांना विजयी करा अशी विनंती या मेळाव्यातून केली आहे. भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनीही नगरपालिकेत सुरू असलेल्या गैरव्यवहार गुंडाशाहीवर कडाडून टीका केली. या विजय संकल्प यात्रा व मेळाव्यास माजी मंत्री आमदार संजयजी कुटे, भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे , नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ अर्पिताताई शिंदे,रिपाई चे जिल्हाध्यक्ष भाई दिलीप खरात, भाजपा नेते योगेंद्र गोडे ,रिपाई चे ज्येष्ठ नेते बाबासाहेब जाधव, भाजपा जिल्हा सरचिटणीस दत्ता पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सौ विजयाताई राठी, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, निवडणूक प्रभारी विश्वनाथ माळी, ज्येष्ठ नेते दीपक वारे विश्राम पवार, भाजपा शहराध्यक्ष मंदार बाहेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अनिल बावस्कर, रिपाई चे केशव सरकटे, बाळासाहेब अहिरे, महिला मोर्चाच्या प्रभारी सौ सिंधुताई खेडेकर ,उषाताई पवार सौ वर्षाताई पाथरकर, वैद्यकीय आघाडी जिल्हाध्यक्ष राजेश्वर उबरहंडे , चे जिल्हा संयोजक योगेश राजपूत , संयोजक मोहन पवार बुलढाणा ग्रामीण अध्यक्ष सतीश भाकरे पाटील,शंकर मलवार यांसह तिन्ही पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कायद्याच्या हातांपलीकडचे!



## संपादकीय लेख

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे. ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. ङ्गहे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाहीफ असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात. आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ङ्ग अदखलपात्र गुन्हा म अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके. मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? नसतो तेव्हा शाई फेकणे, लाथा मारणे, तोंडाला काळे फासणे इत्यादी महाराष्ट्राला नवे नाही. नेते, कार्यकर्ते कोणाची भीती न बाळगता असे करीत असतात.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# महाशक्ती पाठिशी ते महाशक्ती लागली पाठी!

## शिंदेसेना अडचणीत; भाईकडे आता एकच पर्याय..

**नवी दिल्ली :** राज्यातील सत्ताधारी महायुतीत कुरबुरी वाढू लागल्या आहेत. भाजपनं अनेक ठिकाणी शिंदेसेनेच्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना गळाला लावण्यास सुरुवात केल्यानं शिंदेसेनेत प्रचंड नाराजी आहे. या नाराजीचा स्फोट दोन दिवसांपूर्वी झाला. शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवलीत सेनेच्या माजी नगरसेवकांना भाजपनं आपल्याकडे घेतलं. त्यामुळे नाराज झालेल्या शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी परवा कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार घातला. एकटे शिंदे कॅबिनेटला उपस्थित होते. पण या बहिष्काराचा फारसा काही उपयोग झाला नाही.महाराष्ट्रानं आतापर्यंत अनेक सरकारं पाहिली आहेत. एका पक्षाची, आघाडी, युतीची सरकारं राज्यात होऊन गेली. पण सत्तेतील एका पक्षाच्या सगळ्या मंत्र्यांनी कॅबिनेटवर बहिष्कार घातल्याचा प्रकार आजतागायत घडला नव्हता. यावरुन शिंदेसेनेतील नाराजीची कल्पना येईल. शिंदेसेनेचे मंत्री कॅबिनेटला गेले नाहीत. पण त्यांनी नंतर मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. पण त्यांनी



शिंदे यांच्या मंत्र्यांची कानउघाडणी केली. उल्हासनगरातून सुरुवात तुम्ही केली, याची आठवण फडणवीस यांनी करुन दिली.मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिंदे यांच्या मंत्र्यांना झापलं. त्यानंतर शिंदे यांनी थेट दिल्ली गाठली आणि केंद्रीय अमित शहांची भेट घेतली. शिवसेनेत बंड केल्यावर महाशक्ती आहे पाठीशी असं म्हणणारे शिंदे आता त्याच महाशक्तीकडून मिळणारे दणके सहन करत आहेत. पण महाशक्तीकडे जाण्यावाचून पर्याय नाही. शहांनी शिंदेंना भेटीसाठी वेळ दिली. जवळपास ५० मिनिटं चर्चा केली. पण या भेटीतून शिंदे यांच्या हाती फारसं काही लागलेलं नाही.

२०२९ मध्ये भाजपला महाराष्ट्रात स्वबळावर लढायचं आहे. खुद्द अमित शहांनीच याबद्दलची घोषणा केली आहे. गेल्याच वर्षी त्यांनी आपले इरादे स्पष्ट केले आहेत. महाराष्ट्रात कुबड्यांची गरज लागत नाही, असंही शहा गेल्याच महिन्यात महाराष्ट्रात येऊन सांगून गेले आहेत. त्यामुळे शहा महाराष्ट्र भाजपला आस्ते कदम धोरण स्वीकारायला सांगतील याची सुतराम शक्यता नाही. महाशक्तीच्याच आदेशावरुन प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण राज्यात पक्षविस्तार करत आहेत. शिंदेंनी त्यांची तक्रार केल्यानं शहा त्यांना पक्षविस्तार थांबवण्याच्या सूचना देतील, असं होण्याची शक्यता धूसर आहे.उद्धव ठाकरे हिंदुत्वापासून दूर गेल्यानं त्यांची साथ सोडली आणि भाजप सोबत युती केली, असं शिंदे यांनी फुटीनंतर सातत्यानं सांगितलं आहे. त्यामुळे भाजपची साथ सोडणं शिंदे यांच्यासाठी अवघड आहे. त्यातच सत्ता सोडून विरोधी बाकांवर बसणंही कठीण आहे. त्यासाठी किती नेत्यांची तयारी असेल हा प्रश्न आहे. ठाकरेंची साथ सोडताना शिंदेंच्या पाठीशी आमदारांची फौज होती. कारण ते सत्तेतून सत्तेत जात होते. पण सत्तेतून विरोधी बाकावर जाणं आमदारांना अवघड जाईल. त्यातच भाजप सत्तेत असताना विरोधी बाकांवर बसणं सहजसोपं नाही.महाविकास आघाडीचं सरकार असताना शिवसेनेचे अनेक आमदार, मंत्री अडचणीत आले. केंद्रीय तपास यंत्रणा अनेकांच्या पाठी लागल्या, हा भूतकाळ ताजा आहे.

चौकशा थांबल्या आहेत, त्या बंद झालेल्या नाहीत, याचीही कल्पना शिंदेसेनेच्या नेत्यांना आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याचं धाडस उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी २०१९ मध्ये केलं. त्यानंतर भाजपनं सुरु केलेल्या हालचाली पाहता आपले पक्ष कधीही फुटू शकतात, याची जाणीव ठाकरे, पवार यांना होती. पण जे होईल ते सहन करायचं या व्यक्तिरिक्त कोणताही पर्याय त्यांच्यापुढे नव्हता. आता शिंदे त्याच वळणावर उभे आहेत. शक्त तितका प्रतिकार करायचा आणि आला दिवस ढकलायचा, हाच शिंदे यांच्या हातात आहे. आधी पाठीशी असलेली महाशक्ती आता पाठीमागे लागलेली आहे.

## 'जिल्ह्याबाहेरील नेत्यामुळे सिंधुदुर्गात महायुती तुटली' राणेंचा रोख बड्या नेत्याकडे


**सिंधुदुर्ग :** कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेना-भाजप महायुती तुटली आहे. मात्र ही महायुती भाजपच्या एका प्रदेश पातळीवरील मुख्य नेत्याच्या आदेशावरून तुटल्याची सिंधुदुर्ग जिल्ह्यात खुलेआम चर्चा आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा भाजपचे ज्येष्ठ नेते खासदार नारायण राणे यांचा बालेकिल्ला आहे. महायुती तोडून राणे यांचे प्रस्थ कमी करून राणे यांच्या घरातच शिवसेना-भाजप या दोन पक्षांमध्ये वाद लावण्याचा प्रयत्न एका नेत्याने केल्याची खुलेआम चर्चा रंगली आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे शिलेदार असलेले युवानेते आमदार निलेश राणे हे बेधडक आणि स्पष्ट वक्ते म्हणून ओळखले जातात. जिल्ह्यातील महायुती ही भाजपच्या बाहेरच्या नेत्याकडून तुटली आहे. जिल्ह्यातील नेत्यांकडून नाही, अशी स्पष्ट प्रतिक्रिया देत निलेश राणे यांनी भाजपच्या प्रदेश पातळीवरील एका बड्या नेत्यावर थेट निशाणा साधल्याची चर्चा आहे.



माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार नारायण राणे उर्फ एनटीआर शिवसेनेत असताना सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेनेचा एक छत्री अंमल होता. काँग्रेसमध्ये गेल्यावर काँग्रेसकडे सत्ता होती. स्वाभिमान पक्ष स्थापन झाल्यावर स्वाभिमानकडे एक हाती सत्ता होती. आणि आता राणे भाजपामध्ये असताना त्यांचे वर्चस्व सिंधुदुर्ग जिल्ह्यावर असल्याचे स्पष्ट आहे. मात्र हेच वर्चस्व एका बड्या नेत्याला खुपत असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे. खासदार नारायण राणे यांनी महायुती व्हावी म्हणून स्पष्ट भूमिका घेतली होती.

## आता थेट काँग्रेस हायकमांडला पत्र, ऐन निवडणुकीत अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर..

**नागपूर :** महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया वेग घेत असताना नागपूर काँग्रेसमध्ये संतप्त असंतोष उफाळून आला आहे. उमेदवारी आणि पक्षातील नेतृत्वशैलीवरून नाराजी वाढत चालली आहे. पक्षातील अनेक निष्ठावंत कार्यकर्ते आणि पदाधिकारी एकामागून एक बाहेर पडत आहेत. विशेष म्हणजे, हा संघर्ष फक्त अंतर्गत गटबाजीपुरता मर्यादित नसून थेट नेतृत्वाविरोधात बंडाचे स्वर जोर धरताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांत नरखेड तालुका अध्यक्ष सुदर्शन नवघरे यांसह अनेक महत्त्वाचे स्थानिक नेते भाजपमध्ये दाखल झाले. वाडी शहरातील तब्बल ४० पदाधिकाऱ्यांनीही राजीनामे देत काँग्रेसची अडचण वाढवली आहे. तर राजा तिडके, चंद्रपाल चौकसे, शहजाहा अंसारी आदी नेत्यांनीही पक्ष सोडण्याचा मार्ग अवलंबला आहे. स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, गटबाजी आणि पक्षांतर्गत वरिष्ठांकडून होणारे दुर्लक्ष हे या पक्षांतरांचे प्रमुख कारण आहे.या नाराजीची सर्वाधिक झळ नागपूर जिल्हा काँग्रेसला बसत आहे. बुटीबोरी नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारांचे 'एबी फॉर्म' थांबवून पंजा चिन्हच गायब करण्याचा आरोप आघाडीच्या नेतृत्वावर होत आहे. स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारांना दुर्लक्षित करून बाहेरून आणलेल्या, काहींना तर भाजपच्या पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी



आहे.याच पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी महासचिव मुजीब पठान, माजी जिल्हाध्यक्ष बाबा अष्टेकर आणि इतर स्थानिक नेत्यांनी थेट हायकमांडकडे पत्रव्यवहार करत कारवाईची मागणी केली आहे. स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद एका गटाच्या हातात केंद्रीत होत असून, त्याचे राजकीय दुष्परिणाम निवडणुकांमध्ये दिसणारच, असे कार्यकर्ते खुलेआम बोलू लागले आहेत. सध्याच्या परिस्थितीचा परिणाम भाजपच्या रणनीतीवर स्पष्ट दिसू लागला आहे. काँग्रेसमधून नाराज झालेले नेते आणि कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे भाजपला अनेक जागांवर नवीन भक्कम चेहरा आणि संघटन बळ मिळत आहे. नगरपरिषदांसह जिल्हा पातळीवरील निवडणूक समीकरणांमध्ये भाजपचा फायदा निश्चित मानला जात आहे.

## पुण्यात महायुतीतल्या कुरघोडीच्या राजकारणाने टोक गाठलं

**पुणे :** राज्यातील महायुती जरी सत्तेत एकत्र असली, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यात गेल्या काही दिवसांपासून तुफान खटके उडताना दिसत आहेत. तीनही पक्षांतील नेत्यांना आपल्या पक्षात घेण्यासाठी चढाओढ लागल्याचं चित्र संबंध राज्यात पहायला मिळत आहे. यावरून शिवसेना आणि भाजप यांच्यात जोरदार वाद सुरु असताना एकनाथ शिंदे यांनी हा वाद थेट दिल्ली दरबारी पोहोचवत केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांकडे भाजपच्या नेत्यांची तक्रार सुद्धा केली.यनंतर भाजप आणि शिवसेनेतली वाद कुठेतरी मिटतोय असं दिसत असताना महायुतीतील दुसरा घटक पक्ष असणाऱ्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने एकनाथ शिंदे यांना भोरमध्ये जोरदार धक्का दिला आहे. यावेळेस नगरसेवक किंवा नेता नाही तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नगराध्यक्ष पदासाठी ज्या उमेदवाराने अर्ज दाखल केला त्याच उमेदवाराला अजित पवार यांचे आमदार शंकर मांडेकर यांनी गळाला लावत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश दिला. यावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये जोरदार वाकयुद्ध रंगल्याचे



पाहायला मिळालं. या उमेदवार पळवा पळवीवर शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.पाळवा पाळवीच्या राजकारणाला जनता उत्तर देईल. राष्ट्रवादी काँग्रेसने कुठेतरी काहीतरी केले म्हणून आम्ही नाराज होणार नाही. आम्ही एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राजकीय मैदानामध्ये खेळत असतो आणि सतर्क देखील असतो. त्यामुळे कोणी कोणाचा उमेदवार घेतला म्हणून आमचा पक्ष संपत नाही. आम्ही संघर्षातून मोठे झालेला आहोत. त्यामुळे अशा छोट्या छोट्या गोष्टींची आम्हाला विचार करायची गरज नाही', असं उदय सामंत म्हणाले आहेत.दुसरीकडे एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्या भेटीवर सुद्धा उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'एनडीएमध्ये एकनाथ शिंदे हे तीन नंबरचे नेते आहेत. त्यामुळे ते राष्ट्रीय स्तरावर जेव्हा भेटतात तेव्हा ते एनडीएचे प्रमुख नेते म्हणून भेटत असतात. त्यामुळे ते तक्रार करण्यासाठी भेटले हे म्हणणं चुकीचं आहे. शिंदे हे तक्रार करणारे नेते नसून हे सोल्यूशन काढणारे नेते आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका दिल्लीमधून स्पष्ट केली आहे', असं उदय सामंत यांनी सांगितलं.दरम्यान, 'महायुतीमधील प्रमुख तीन पक्षांतील वरिष्ठांनी युतीमध्ये मिठाचा खडा टाकू नये ही आमच्या सर्वांची भूमिका आहे. . त्यांच्यामध्ये वाद लागणार नाही. शिंदे यांनी यापूर्वीच आपल्या पक्षातील नेत्यांना सांगितलं आहे. भाजपमधून शिवसेनेत कोणताही नेत्यांना प्रवेश द्यायचे नाहीत. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रदेशाध्यक्षांना सूचना दिल्यास शिवसेनेमधून भाजपमध्ये प्रवेश होणार नाहीत', असं सामंत म्हणाले.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे,' बारावीच्या मुलीकडून प्रेमाला नकार; संतापलेल्या तरूणाने भररस्त्यात तिला..

**तामिळनाडू :** बुधवारी सकाळी तामिळनाडूच्या रामेश्वरममध्ये १२वीच्या विद्यार्थिनीची एका तरुणाने भरचौकात दिवसाढवळ्या चाकूने वार करून हत्या केल्याची घटना घडली आहे. त्याच्या प्रेमाच्या प्रस्तावाला नकार दिल्यामुळे आरोपीने तिची क्रूरपणे हत्या केली आहे.सेरंगोझाई येथील रहिवासी आणि जिल्हा सरकारी शाळेत शिकणाऱ्या मुलीचा २१ वर्षीय मुनीयाराजकडून सतत छळ होत असल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, मुनीयाराज तिच्या मागे लागून त्याचे तिच्यावर प्रेम असल्याचा आग्रह धरत होता. मुलीने या त्रासाबद्दल वडील मरियप्पन यांना सांगितले होते. त्यानंतर मरियप्पन यांनी मुनीयाराजच्या घरी जाऊन त्याच्या नातेवाईकांना याबाबत इशारा दिला होता.पोलिसांनी सांगितले की बुधवारी सकाळी शाळेत जात असताना मुनीयाराजने पुन्हा तिचा मार्ग अडवला आणि चाकू दाखवत त्याच्या प्रस्तावाला उत्तर देण्याची धमकी दिली. तिने नकार दिल्यावर त्याने तिच्यावर चाकूने हल्ला करून तिचा जागीच खून केला. नंतर मुलीचे मृतदेह ताब्यात घेऊन



जिल्हा सरकारी रुग्णालयात पोस्टमॉर्टेमसाठी पाठवण्यात आले. घटनास्थळावरून पळून गेलेल्या मुनीयाराजला नंतर अटक करण्यात आली. या प्रकरणातील पुढील तपास सुरू आहे.

या घटनेनंतर मुलीच्या परिवाराने आणि परिसरातील नागरिकांने आरोपीवर कठोर कारवाई व्हावी या मागणीसाठी रस्त्याच्या मध्ये बसून आंदोलन केले. पीएमकेचे नेते अंबुमणी रामदोस यांनी या हत्येचा निषेध करून मुनीयाराजला ङ्कमानव रूपातील राक्षसङ्क असे संबोधले आणि महिलांच्या व मुलांच्या सुरक्षेत सरकार अपयशी ठरल्याचा आरोप केला. डिएमके सरकारच्या कारकिर्दीत बालकांवरील गुन्हे आणि पॉक्सो (झजउडज) प्रकरणांमध्ये झालेली वाढ दाखवत त्यांनी ङ्कसत्ताधारी पक्षाच्या छत्राखाली राहणाऱ्या समाजकंटकांनाच संरक्षण मिळतेङ्क असा आरोप केला. रामदोस यांनी आरोपीला कठोर शिक्षा द्यावी, मुलीच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची मदत द्यावी आणि राज्य सरकारने महिलांसाठी व मुलांसाठी अधिक सुरक्षित वातावरण निर्माण करावे, अशी मागणी केली. मुनीराज गेल्या एका वर्षापासून या मुलीचा पाठलाग करत होता. तेव्हा पासून, त्याने बऱ्याच वेळा तिच्यासमोर प्रेमसंबंधांची मागणी केली, पण मुलीने प्रत्येक वेळी नकार दिला. बुधवारी त्याने तिला भररस्त्यात गाठत तिची आमाणुष हत्या केल्यामुळे परिसरात मुलींच्या सुरक्षितेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## अमावस्येची रात्र भयभीत करणारी! स्मशानभूमीत अघोरी पूजेचे अवशेष

**रायगड :** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शांत असलेल्या माथेरानमध्ये बुधवारी (१९ नोव्हेंबर २०२५) अमावास्येच्या रात्री घडलेल्या अघोरी विधीच्या प्रकाराने खळबळ उडाली आहे. माथेरान स्मशानभूमीत अघोरी पूजा झाल्याचे आज सकाळी उघडकीस आले असून, या प्रकारामुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी नगरपालिका कर्मचारी विजय चव्हाण अंतिम संस्कारस्थळाची नियमित पाहणी करण्यासाठी स्मशानभूमीत गेले असता त्यांना धक्कादायक दृश्य दिसले. स्मशानभूमीच्या मध्यभागी लाल भोपळे, सुरी, त्यावर ठोकलेल्या अगरबत्त्या, मोठी मडके, कापलेल्या बकऱ्याची मुंडी, मास्यांचे तुकडे तसेच ताजे रक्त जमिनीवर पसरलेले दिसले. स्मशानभूमीच्या कडेला खोदलेले दोन खोल खड्डे देखील संशयास्पद अवस्थेत आढळले.विजय चव्हाण यांनी तातडीने नगरपालिका आणि स्थानिक पोलीस प्रशासनाला याची माहिती दिली. पहाटेच्या सुमारास कोणी तरी व्यवस्थित तयारी करून संपूर्ण रात्री अघोरी विधी केला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.दरम्यान,



माथेरान शहरात निवडणूक वातावरण तापले असताना असा प्रकार समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रम निर्माण झाला आहे. निवडणुकीत दबावतंत्र म्हणून काळी जादू, अघोरी कृती किंवा मानसिक दडपण आणण्याचा प्रयत्न तर नाही ना? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.अशा प्रकारच्या घटना माथेरानमध्ये याआधी कधीही समोर आल्या नव्हत्या. हे कोणीतरी जाणूनबुजून निवडणुकीच्या काळात वातावरण अस्थिर करण्यासाठी केले असावे,ङ्क अशी प्रतिक्रिया माथेरानच्या काही ज्येष्ठ नागरिकांनी दिली.माणगाव आणि माथेरान पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा सुरू केला आहे. परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु आहे. रात्री स्मशानभूमीत कोण आले होते? याचा शोध घेतला जात आहे.

## अखेरची इच्छा लिहित महाराष्ट्रातील विद्यार्थ्याने दिल्लीत आयुष्य संपवलं

**नवी दिल्ली :** दिल्लीत एक हृदयद्रावक घटना घडली. येथे मंगळवारी सकाळी आपल्या ड्रामा क्लबसाठी मोठ्या उत्साहाने घराबाहेर पडलेल्या एका १६ वर्षीय शालेय विद्यार्थ्याने दुपारच्या सुमारास आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. या विद्यार्थ्याने एक सुसाइड नोट लिहिलेली आढळून आली, ज्यामध्ये त्याने आपले अवयव दान करावेत अशी विनंती केली आहे. तसेच, इतर कोणत्याही मुलाला त्याच्यासारखे दुःख सहन करावे लागू नये, असंही त्याने या सुसाइड नोटमध्ये लिहिलं.

त्याने त्याचे वडील, आई आणि मोठ्या भावाचीही माफी मागितलीयाप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, एका खाजगी शाळेत शिकणाऱ्या दहावीच्या विद्यार्थ्याने मंगळवारी दुपारी २:३४ वाजता राजेंद्र प्लेस मेट्रो स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरून उडी घेतली. प्रत्यक्षदर्शींनी त्याला ताबडतोब जवळच्या बीएलके रुग्णालयात नेले. मात्र, तो खूप जखमी झालेला होता. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

## इंडिपेंडेंट व्हायचंय; आईने २० दिवसांच्या बाळाला नदीत फेकलं

**गोंदिया :** एक आई इतकी निर्दयी असू शकते, याचा कोणी विचारही करु शकत नाही. गोंदिया जिल्ह्यात बुधवारी एका दुःखद घटना घडली, ज्याने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. येथे पोलिसांनी एका २२ वर्षीय महिलेला तिच्या नवजात बाळाची हत्या केल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, महिलेने तिच्या अवघ्या २० दिवसांच्या बाळाला वैनगंगा नदीत फेकून देत त्याची हत्या केली. ही घटना १७ नोव्हेंबर रोजी घडल्याची माहिती आहे. परंतु तपासादरम्यान तिचा हा भयंकर कारनामा उघड झाला.याप्रकरणी एका पोलिस अधिकाऱ्याने दिलेल्या अधिक माहितीनुसार, सुरुवातीला महिलेने खोटी कहाणी रचून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तिने दावा केला की, १७ नोव्हेंबर रोजी एका अज्ञात व्यक्तीने तिचे मूल चोरले आहे. या जबाबाच्याया आधारे, हरवलेल्या २० दिवसांच्या बाळाचा शोध सुरू करण्यात आला. परंतु तपासादरम्यान, पोलिसांना तिच्या कहाणीवर संशय आला. पोलिसांनी तिला चौकशीसाठी ताब्यात घेतलं आणि तिची कठोर चौकशी केली. तेव्हा तिने स्वत:च आपल्या मुलाला गोंदियाच्या वैनगंगा नदीत फेकून देत त्याची हत्या केल्याची कबुली दिली.या प्रकरणाच्या प्राथमिक तपासात असे दिसून आले की, महिलेला नोकरी करायची होती,तिला स्वतंत्रपणे तिचे जीवन जगायचे होते, परंतु त्याऐवजी तिला घरीच राहून तिच्या मुलाची काळजी घ्यावी लागली असती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिला असं वाटू लागलं होतं की मूल झाल्याने ती घरातच मर्यादित राहील.

या मानसिक दबावामुळे आणि परिस्थितीमुळे तिने हे अमानुष पाऊल उचलल्याचं सांगितलं जात आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपी महिलेने मुलाला वैनगंगा नदीत फेकल्याची कबुली दिली आहे. शोध घेतल्यानंतर स्थानिकांच्या मदतीने मुलाचा मृतदेह नदीतून बाहेर काढण्यात यश आलं आहे. पोलिसांनी महिलेविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे आणि पुढील तपास सुरू आहे. या घटनेमागे इतर काही हेतू किंवा दबाव होता का याचाही तपास अधिकारी करत आहेत.

## कापूस वेचायला गेल्या त्या परतल्याच नाहीत.. अनब सायंकाळी शेतात सख्ख्या जावांची बॉडी



**नांदेड ;** जिल्ह्यातील माहूर तालुक्यात गुरुवारी (२० नोव्हेंबर) सायंकाळी एक धक्कादायक घटना घडली आहे. शेतात कापूस वेचण्यासाठी गेलेल्या दोन सख्ख्या जावांची गळा आवळून हत्या करण्यात आली आहे. शिवाय हत्येनंतर त्या दोघींच्या अंगावरचे दागिने सुद्धा काढण्यात चोरण्यात आले आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

माहूर तालुक्यातील पाचोंदा शिवारात आज सायंकाळी ही घटना घडली. अंतकलाबाई अशोक आढागळे ( वय ५५) आणि अनुसयाबाई साहेबराव आढागळे(वय ४५) अशी मृत महिलांची नावे आहेत. या दुहेरी हत्याकांडामुळे माहूर तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पाचोंदा शिवार हा डोंगराळ भाग असून माहूर शहरा पासून ३५ किलो मीटर दूर आहे. अंतकलाबाई आढागळे आणि अनुसयाबाई आढागळे या याच गावातील रहिवासी आहेत. नात्याने ह्या दोघी सख्ख्या जावा आहेत. नेहमी प्रमाणे दोघी कापूस वेचण्यासाठी आजही शेताकडे गेल्या होत्या. स्वतःच्या शेतात कापूस वेचणीचे काम करत असताना अज्ञाताने दोघींचे गळा आवळून हत्या केली. त्यानंतर अज्ञाताने त्या दोघींच्या अंगावरील दागिनेही चोरले.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके यांनी घटना घटनास्थळी धाव घेतली. यावेळी, दोन्ही महिलेच्या अंगावरील दागिने गायब झाल्याचे पोलिसांना निदर्शनास आले.

हत्येचे नेमके कारण अजून स्पष्ट झाले नसले तरी दोन्ही महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र गायब असल्याने लुटमारीच्या उद्देशाने सदरील खून झाल्याची चर्चा आहे.या दुर्दैवी आणि हृदयद्रावक घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. या घटनेने आढागळे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.


दरम्यान ही घटना लूटमारीशी संबंधित आहे की कोणत्या वैयक्तिक वैमनस्यातून घडली का याचा तपास माहूर पोलीस करत आहेत. शेतात रोज प्रमाणे कापूस वेचण्यासाठी जाणे त्यांच्या जीवावर बेतेल असा कोणीही विचार सुद्धा केला नव्हता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मैदानावर पलाशने स्मृती मानधनाला केलं प्रपोज







**नवी दिल्ली :** भारताची स्टार क्रिकेटपटू डीळींळ चरपवहरपर आणि संगीतकार-फिल्ममेकर झरश्रीह चींलहहरश्र आयुष्यातील एका महत्वाच्या वळणावर येऊन पोहोचले आहेत. २३ नोव्हेंबर रोजी ही जोडी लग्नबंधनात अडकणार असून त्यापूर्वी या दोघांचा एक खूपच रोमँटिक व्हिडिओ समोर आला. पलाशने स्मृतीला ऐतिहासिक क्रिकेट मैदानावर प्रपोज केले आणि हा व्हिडिओ सध्या इंटरनेटवर सर्वात चर्चेत आला आहे. या प्रपोजल व्हिडिओने त्यांच्या जगभरातील चाहत्यांचे लक्ष वेधले.पलाशने इन्स्टाग्राम वर एक खूपच स्पेशल आणि भावनिक व्हिडिओ शेअर केला. ज्यामध्ये त्याने जेव्हा स्मृतीला प्रपोज केले तेव्हाचा क्षण आहे. नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर त्याने स्मृतीला प्रपोज केले. तिच्यासाठी हा सुखद धक्काच होता. कारण हे तेच मैदान आहे जिथे भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक २०२५ ची ट्रॉफी मानाने जिंकली आणि मिरवली होती. अगदी काहीच दिवसांपूर्वी सर्व भारतीय या क्षणाचे साक्षीदार झाले होते.व्हिडिओमध्ये, पलाश स्मृतीचे डोळे झाकून तिला मैदानातील पिचवर घेऊन येतो. या मैदानावर नेहमी भारताच्या जर्सीमध्ये येणारी स्मृती यावेळी खूपच स्टनिंग असा ड्रेस परिधान करुन पोहोचली, या लाल ड्रेसमध्ये ती खूपच सुंदर दिसत होती. पलाशने डोळ्यावरील पट्टी हटवताच तिच्या चेहऱ्यावर हसू उमटलं आणि त्यानंतर गुडघ्यावर बसून त्याने तिच्या बोटात अंगठी घातली. शिवाय लाल गुलाबांचा मोठ्ठा बुकेही दिला. दोघांनीही एकमेकांना प्रेमाने मिठी मारली अनब त्यानंतर स्मृतीनेही पलाशला एन्गेजमेंट रिंग घातली.यावेळी पलाशची बहीण गायिका पलक मुच्छल आणि त्यांचा मित्रपरिवार उपस्थित होता. सर्वांनी मिळून धमाल डान्स केला. तर व्हिडिओच्या शेवटी स्मृती-पलाश त्यांची अंगठी फ्लॉन्ट करताना दिसले. पलाशने 'डहश डरळव धशी' अशी रोमँटिक कॅप्शन हा व्हिडिओ शेअर केला आहे. दरम्यान हा व्हिडिओ समोर येण्याआधीच स्मृतीच्या साखरपुड्याची आनंदाची बातमी समोर आली होती. जेमिमा रॉड्रिग्ज, श्रेयंका पाटील, अरुंधती रेड्डी आणि राधा यादव या तिच्या सहकाऱ्यांसोबत स्मृतीचे एक रील समोर आलेले. 'समझो हो ही गया' या गाण्यावर डान्स करत तिने तिची साखरपुड्याची अंगठी सर्वांना दाखवली होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या जोडप्यासाठी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली होती. त्यांनी या संदेशामध्ये पलाश-स्मृतीच्या लग्नाच्या तारखेचाही उल्लेख केलेला. त्यांपूर्वी त्यांच्या लग्नाची तारीख अधिकृतरित्या समोर आली नव्हती. पंतप्रधानांनी शुभेच्छा देणारी पोस्ट शेअर केल्याने स्मृती-पलाश यांच्या लग्नाची अधिकच चर्चा होते आहे.

## हिरो बनायला गेला, पण भारताच्या पराभवाचा व्हिलन ठरला

**कोलकाता :** भारताला बांगलादेश विरुद्धच्या सेमी फायनलमध्ये लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. भारतासाठी एक खेळाडू हिरो बनायला गेला खरा, पण तो संघाच्या पराभवाचा व्हिलन ठरल्याचे पाहायला मिळाले. आशिया कप रायझिंग स्टार स्पर्धेच्या सेमी फायनलचा टर्निंग पॉइंट नेमका ठरला तरी काय, हे आता समोर आले आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामना चांगलाच रंगला होता. भारताला यावेळी विजयासाठी एका चेंडूत तीन धावांची गरज होती. त्यावेळी भारताचा हर्ष दुबे यावेळी फलंदाजी करत होता. हर्षला यावेळी मोठा फटका मारता आला नाही. हर्षने मारलेला चेंडू हा चौकार जाणार नाही, हे सर्वांना माहिती होते. पण भारताच्या हर्ष आणि नेहाल वधेरा यांनी यावेळी धावत तीन धावा पूर्ण केल्या, त्यामुळे हा सामना सुपर ओव्हरमध्ये गेला. कारण भारत आणि बांगलादेश या दोन्ही संघांचे २० षटकांत समान १९४ धावा झाल्या होत्या.

भारताला विजयासाठी अजून एक संधी निर्माण झाली होती. कारण सुपर ओव्हर जिंकून भारताला थेट अंतिम फेरीत पोहोचता आले असते. भारतासाठी सुपर ओव्हर सर्वात महत्वाची होती आणि पण तिथेच सामना कसा फिरला, हे आता समोर आले आहे.भारताची सुपर ओव्हरमध्ये पहिली फलंदाजी होती. यावेळी भारताच्या संघात वैभव सूर्यवंशी, प्रियांश आर्या आणि नेहाल वढेरा हे चांगल्या फॉर्मात दिसत होते. त्यामुळे हे तिघे भारताकडून फलंदाजीला येतील, असे वाटत होते. पण सुपर ओव्हरमध्ये भारताचा कर्णधार



जितेश शर्मा हा फलंदाजीसाठी आला. जितेशने काहीही विचार न करता स्ट्राइकही घेतली.पहिल्याच चेंडूवर तो स्कुपचा फटका मारण्यासाठी गेला आणि क्लीन बोल्ड झाला. खरं तर जितेशला फलंदाजीला यायची काहीत गरज नव्हती. कारण भारताकडे तीन अव्वल फलंदाज होते. पण जितेश शर्मा यावेळी हिरो बनायला गेला. पण महत्वाच्या फलंदाजांवा डावलून तो खेळायला आला आणि शून्यावर बाद झाला. त्यामुळे हिरो बनायला आलेला जितेश शर्मा हा पराभवाचा व्हिलन ठरला. जिथे जितेश बाद झाला तिथेच भारताने हा सामान गमावला. त्यामुळे जितेश शर्माची विकेट यावेळी टर्निंग पॉइंट ठरली.

भारताने सुपर ओव्हर कशी बशी गाठली खरी, पण एका खेळाडूच्या चुकीचा भारतीय संघाला सर्वात मोठा फटका बसल्याचे पाहायला मिळाले. कारण या एका चुकीमुळे यावेळी भारताला सेमी फायनलचा सामना गमवावा लागला.

## गिल कसोटी सामना सोडून मुंबईला का येणार

**गुवाहाटी :** शुभमन गिल दुखापतीमधून बरा होऊ शकलेला नाही. त्यामुळे त्याला आता भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा कसोटी सामना खेळता येणार नाही. पण एक कर्णधार म्हणून तो कसोटी सामना पाहण्यासाठी तरी गुवाहाटी येथे राहील, असे म्हटले जात होते. पण शुभमन गिल कसोटी सामना सोडून आता मुंबईला येणार आहे. पण शुभमन गिल मुंबईचा सामना सोडून आता मुंबईत का येणार आहे, याचे मोठे कारणही आता समोर आले आहे.पहिल्या कसोटी सामन्यात शुभमन गिल फलंदाजीला आला होता. पण तो यावेळी फक्त तीनच चेंडू खेळला आणि त्यानंतर त्याच्या मानेला दुखापत झाली. संघाच्या डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले खरे, पण ही दुखापत गंभीर स्वरुपाची होती. त्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले. शुभमन गिलवर त्यानंतर संघाच्या डॉक्टरांनी उपचार केले. पण त्यानंतर शुभमनची तब्येत खालावली आणि त्याला थेट स्ट्रेचरवरून हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. हॉस्पिटलमध्ये संपूर्ण रात्र त्याच्यावर उपचार केले. शुभमन गिल त्यानंतर संघात दाखल झाला खरा, पण तो कसोटी सामना खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पण शुभमन गिल हा गुवाहाटीला सामना पाहण्यासाठी थांबणार होता, पण तो आता गुवाहाटी येथे न थांबता थेट मुंबईला येणार असल्याचे समजते आहे.काही जणांनी या गोष्टीचे कनेक्शन सारा तेंडुलकरशीही जोडले आहे, पण त्यामध्ये तथ्य नाही. कारण शुभमन गिल हा मुंबईमध्ये आपल्या दुखापतीबाबतच येणार आहे. मुंबईत मानेचे स्पेशालिस्ट डॉक्टर आहेत. त्यांची भेट घेण्यासाठी गिल मुंबईत येणार आहे.

## एकही धावा न करूनही भारताला होती विजयाची संधी

**गुवाहाटी :** भारत आणि बांगलादेशचा सेमी फायनलचा सामना हा सेमी फायनलमध्ये गेला होता. भारतीय संघाला सुपर ओव्हरमध्ये एकही धाव करता आली नाही. पण एकही धाव न करता भारताला विजय साकारण्याची संधी मिळू शकली असती. पण त्यावेळी भारताच्या एका खेळाडूकडून मोठी चूक घडली आणि त्यामुळे भारताला सामना गमवावा लागला. भारताकडून नेमकी काय चूक झाली याचा व्हिडिओ आज जोरदार व्हायरल झाला आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यातील सेमी फायनलचा सामना सुपर ओव्हरमध्ये गेला होता. सुपर ओव्हरमध्ये भारताची प्रथम फलंदाजी होती. त्यामुळे जितेश शर्मा आणि रमणदीप सिंग हे फलंदाजीला आले होते. पहिल्याच चेंडूवर स्कुपचा चुकीचा फटका मारताना जितेश शर्मा शून्यावर बाद झाला. त्यानंतर फलंदाजीसाठी आला तो आशुतोष शर्मा. आशुतोषला खेळण्यासाठी पाच चेंडू शिल्लक होता. आशुतोष सावधपणे खेळला असता तर भारताला काही तरी धावा करता आल्या असत्या, पण आशुतोष शर्मा यावेळी मोठा फटका मोठा फटका मारायला गेला आणि तोदेखील आपल्या पहिल्याच चेंडूवर बाद झाला. त्यामुळे दोन चेंडूत भारताने दोन विकेट्स गमावले आणि त्यांना एकही धाव करता आली नव्हती. त्यामुळे बांगलादेशला विजयासाठी फक्त एकच धाव करायची होती. पण तरीही भारताने बांगलादेशला चांगलेच जखडून ठेवले होते.भारताने यावेळी सुयश शर्माला गोलंदाजीसाठी आणले. सुयशने




पहिल्याच चेंडूवर यासिर अलीला झेल बाद केले. रमणदीप सिंगने सीमारेषेवर चांगला झेल पकडला होता. त्यामुळे भारताला एका विकेटची गरज होती, तर बांगलादेशला एका धावेची गरज होती. भारताने जर विकेट मिळवली असती तर ही सुपर ओव्हर बरोबरीत सुटली असती आणि त्यामुळे भारताला विजयाचे दार उघडू शकले असते, पण तसे घडले नाही. कारण त्यावेळी एक चूक घडली. सुयश शर्माने यावेळी चेंडू टाकला खरा, पण तो चेंडू लेग स्टम्पच्या बाहेर गेला. बांगलादेशचा फलंदाज यावेळी हा चेंडू खेळताना अडखळला खरा, पण चेंडू लेग स्टम्पच्या बाहेर असल्यामुळे पंचांनी तों नो बॉल घोषित केला. त्यामुळे बांगलादेशला एक धाव मिळाली आणि ते विजयी ठरले. त्यामुळे ही वाईड चेंडूची चूक भारताला चांगलीच महागात पडली.भारताने जर ही सुपर ओव्हर बरोबरीत सोडवली असती, तर पुढची सुपर ओव्हर झाली असती. ती सुपर ओव्हर जिंकून भारताला अंतिम फेरीत पोहोचता आले असते, पण तसे घडले नाही.

# इंडस्ट्री माफियांचा खरा चेहरा केला उघड

## प्रसिद्ध दिग्दर्शकासोबतची कॉल रेकॉर्डींग केली लीक..

**मुंबई :** मुकेश भट्ट निर्मित 'सावी' या चित्रपटामुळे अभिनेत्री दिव्या खोसला कुमार पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. अलिकडेच आलिया भट्टच्या 'जिगरा' हा चित्रपट 'सावी' ची कॉपी असल्यावरून दिव्या आणि मुकेश यांच्यात मतभेद झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मुकेश भट्टने याला बातम्यांना पब्लिसिटी स्टंट म्हटले आहे आणि म्हटले आहे की, 'आलियाला कॉपी चित्रपटाची आवश्यकता नाही.' दरम्यान, दिव्याने मुकेशसोबतचा एक फोन कॉल लीक केला आहे, जो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

दिव्या खोसलाने तिच्या इंस्टाग्रामवर मुकेश भट्टसोबतच्या या फोन कॉलचे रेकॉर्डिंग शेअर केले आहे. रेकॉर्डिंगमध्ये त्यांचे संभाषण स्पष्टपणे ऐकू येते. त्यात दिव्या मुकेशला विचारते, 'सावी आणि 'जिगरा' वादाबद्दल तुम्ही माझ्याविरुद्ध काही बोललात का, मी फालतू वागते असे तुम्ही मीडियासमोर का म्हटल?' मुकेश स्पष्टपणे याला नकार देत म्हणतात, 'मी याबद्दल कोणाशीही बोललो नाही. हे सर्व मुद्दाम प्लॅनिंगने होत आहे. मी असे का करेन? हे तुझ्या वाढदिवसासाठी कॉन्ट्रॉव्हर्सी म्हणून होत आहे, पण त्याचा आपल्या नात्यावर परिणाम होऊ देऊ नकोस. कोणाच्याही फसवणुकीत अडकू नको.




दिव्याने फोन कॉल शेअर केला आणि कॅप्शनमध्ये लिहिले, 'या खुलाशाने मला धक्का बसला आहे. मला अलीकडे जे कळले ते हृदयद्रावक आहे. जड अंतःकरणाने, मला वाटते की हे सत्य लोकांसमोर आणणे महत्वाचे आहे, विशेषतः आपल्या चित्रपट उद्योगात लॉबिंग आणि गेटकीपिंगचा सामना करणाऱ्या सर्व कलाकारांसाठी आणि चाहत्यांसाठी.' 'दुर्दैवाने, मुकेश भट्ट आणि माझ्यामधील संभाषण शेअर करण्याशिवाय माझ्याकडे पर्याय नाही जेणेकरून लोकांना स्वतःला ऐकू येईल की काही बॉलिवूड मधील ग्रूप बाकिच्यांचे करिअर कसे खराब करण्याचा आणि त्यांची ईमेज खराब करण्याचा कसा प्रयत्न करतात. आता बोलण्याची आणि इंडस्ट्री माफियांचा पर्दाफाश करण्याची वेळ आली आहे.

# कुंभमेळ्यासाठी झाडे तोडल्याने सयाजी शिंदे संतापले!

## सरकारला खडेबोल सुनावाले, आवाज उठवला तर..

**मुंबई :** नाशिकमधील तपोवन परिसरातील सुरू असलेल्या वृक्षतोडीविरोधात अभिनेते सयाजी शिंदे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहे. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये संताप उसळला आहे. त्यातच सयाजी शिंदे यांनी यावर थेट भाष्य करत सरकारला कठोर शब्दांत सुनावले. माध्यमांशी बोलताना सयाजी शिंदे म्हणाले, ङ्गतपोवनमधील झाडे तोडणे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. कुंभमेळ्यासारख्या धार्मिक सोहळ्यासाठी झाडांची कत्तल करणे योग्य नाही. तुम्ही एक झाड तोडून दहा झाडे लावू असे विधान करता, पण ते फालतू आहे. आम्ही एकही झाड तोडू देणार नाही. एक झाड वाचवण्यासाठी १०० माणसं उभी राहतील, पण ते झाड तोडू देणार नाही. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे पर्यावरण रक्षणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, ङ्गसरकार आपलं असूनसुद्धा बेजबाबदार वागते आहे. माझ्या तोंडात शिव्या येतात इतका राग येतोय. मला अनेक फोन येतात आणि लोक नागपूर आणि कर्जत येथील मोठ्या प्रमाणातील वृक्षतोडीचा मुद्दा देखील उपस्थित केला. नागपुरात ४५ हजार झाडे तोडणार आहेत, कर्जतमध्येही तसेच. आपल्या डोळ्यासमोर जी झाडे तोडली जात आहेत, ती आपण वाचवली पाहिजेत; नाहीतर माणसं पेटून उठतील.असे ते म्हणाले.



राज्य सरकारवर निशाणा साधताना सयाजी शिंदे म्हणाले, सरकारने डोळे उघडले पाहिजेत. तुम्ही किती झाडे लावली त्याचा हिशोब द्या. लोकांनी आवाज उठवला की तो आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो. पण बोलणाऱ्याला बोलता आले पाहिजे. आपल्याकडे लोकशाही आहे की हुकुमशाही हेच समजत नाही. झाडांवर राजकारण करू नका. या संपूर्ण प्रकरणात सयाजी शिंदे यांनी पर्यावरण संरक्षणाचा मुद्दा स्पष्टपणे मांडला असून, तपोवनसह महाराष्ट्रभर सुरू असलेल्या वृक्षतोडीविरोधात जनतेने एकजूटीने उभे राहावे, असे आवाहन केले आहे.

# प्राजक्ता आणि गश्मीरने चाहत्यांना दिली आनंदाची बातमी

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय जोडी म्हणून प्राजक्ता माळी आणि गश्मीर महाजनी यांची ओळख कायम राहिली आहे. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फुलवंती' या चित्रपटात दोघांनी एकत्र काम करत प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यांच्या केमिस्ट्रीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला होता. आता याच जोडीने त्यांच्या चाहत्यांसाठी आणखी एक मोठं सरप्राइज जाहीर केलं आहे.

प्राजक्ता माळी आणि गश्मीर महाजनी यांनी नुकताच सोशल मीडियावर एक खास व्हिडिओ शेअर करत सांगितले की, 'फुलवंती' आता तुम्हाला हिंदीमध्ये भाषेत बघता येणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचं हिंदीत डबिंग स्वतः प्राजक्ता आणि गश्मीर यांनीच केलं आहे. त्यामुळे हिंदी प्रेक्षकांना त्यांच्या मूळ आवाजातच 'फुलवंती'चा आनंद घेता येणार आहे.


चित्रपटातील सर्व गाणीदेखील हिंदीत रेकॉर्ड करून प्रदर्शित करण्यात आली आहेत. मराठी प्रेक्षकांनंतर आता हिंदी भाषिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदी डबिंगसंदर्भात बोलताना गश्मीर महाजनी म्हणाला, 'मराठी चित्रपटसृष्टीचं कंटेंट राष्ट्रीय स्तरावर पोहोचायला हवं. 'फुलवंती' हिंदीत डब करण्यामागचा उद्देश हाच आहे. अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचावा.



# चार वर्षांनंतर श्रीकांत आणि रुक्मामध्ये कांटे की टक्कर; दोन ब्लॉकबस्टर सीझननंतर तिसरा सीझन

**मुंबई :** मनोज बाजपेयी यांच्या बहुप्रतिक्षित सिरीजचा, 'द फॅमिली मॅन' चा तिसरा सीझन अखेर चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर प्रदर्शित झाला आहे. २१ नोव्हेंबर रोजी प्राइम व्हिडिओवर या शोचा प्रीमियर झाला. नवीन सीझनमध्ये जयदीप अहलावत विरुद्ध मनोज बाजपेयी यांची लढताना दिसत आहे. ट्रेलर लाँच झाल्यानंतर, लोक या सिरीजची आतुरतेने वाट पाहत होते.

श्रीकांत तिवारी (मनोज बाजपेयी) यांचे जीवन आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. यावेळी, कथा ईशान्येकडे वळते, जिथे देशावर ड्रग्ज तस्करीचा मोठा धोका आहे. या धोक्यामागे नवीन खलनायक रुक्मा (जयदीप अहलावत) आहे, ज्याची बॉस मीरा (निम्रत कौर) आहे. यावेळी, श्रीकांतला केवळ देश वाचवायचा नाही तर त्याच्या कुटुंबालाही या धोक्यापासून वाचवायचे आहे. परिस्थिती इतकी बिकट होते की त्याचे काम त्याच्या कुटुंबावर गंभीर परिणाम करते. रुक्मा आणि मीरा दोघेही त्याच्या मागे लागले आहेत हे लक्षात आल्यावर त्याला त्याच्या कुटुंबासह पळून जावे लागते. पुढे काय होते? अमेझॉन प्राइम व्हिडिओवर स्ट्रीम होणाऱ्या 'द फॅमिली मॅन' या वेब सिरीजमध्ये याचे उत्तर मिळेल. मनोज बाजपेयी यांची मालिका 'द फॅमिली मॅन ३' स्ट्रीमिंग सुरू होताच, लोकांनी त्याचे सात भाग पाहिल्यानंतर त्यांचे मत मांडण्यास सुरुवात केली. काहींना 'द फॅमिली मॅन सीझन ३' आवडला आणि तो अत्यंत आकर्षक असल्याचे म्हटले. दरम्यान, नवीन सीझन काही लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही.



अनेकांनी म्हटले की हा वेब शो कंटाळवाणा होता आणि त्यात मागील सीझनसारखा आनंद नव्हता. सोशल मीडिया नेटकऱ्यांनी या सिरीजचे कौतुक केले. एका नेटकऱ्यांने लिहिले, 'द फॅमिली मॅन ३'' चांगला होता, पण तो आणखी चांगला होऊ शकला असता. श्रीकांत तिवारीने यावेळी वॉन्टेड मॅनची भूमिका चांगली बजावली, पण फॅमिली मॅन म्हणून तो थोडा कमी पडला. राज आणि डीके यांचे विश्व आणि कॅमिओ उत्कृष्ट होता.'

दुसऱ्या एका नेटकऱ्यांने लिहिले, 'राज आणि डीके, तुम्ही आमच्या आवडत्या मालिकेचे काय केले आहे? तुम्ही तीच कथा घेतली आहे. भारतीय सरकार आणि भारतीय एजन्सी एका भारतीय वंशाच्या खाजगी संस्थेविरुद्ध लढत आहे. जसे की पठाण, स्पेशल ऑप्स इत्यादी.मी निराश झालो आहे.' दुसऱ्या एका नेटकऱ्यांने ट्विट केले, 'खूप कंटाळवाणे. कोणताही सस्पेन्स नाही, ड्रामा नाही, कोणताही थरार नाही, फक्त अभिनय.६ तास वाया गेले आणि सर्व आशा संपल्या. मला शंका आहे की या गोंधळानंतर ते सीझन ४ची रिस्क घेतील का?' या सिरीजमध्ये मनोज तिवारी सह जयदीप अहलावत, शरीब हाश्मी, प्रियामणी, आश्लेषा ठाकूर, वेदांत सिन्हा, श्रेया धनवंतरी आणि गुल पनाग हे प्रमुख भूमिकांमध्ये आहेत.

# समाजकल्याण कार्यालयात तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा; समान हक्क व सन्मानावर भर

जनसंचलन/बुलढाणा

समाज कल्याण कार्यालयामार्फत आज बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे शासकीय वसतीगृहात तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी समान हक्क, संवेदनशील व सन्मानावर भर देण्यात आला.

दि. २० नोव्हेंबर २००५ रोजी तृतीयपंथीय समुदायाला भेडसावणाऱ्या अन्याय, भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात नोंद झालेल्या घटनांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. त्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा अधिकृत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे बाल कल्याण समिती सदस्य अधिवक्ता अनुराधा वावगे यांनी तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध कायदे, दस्तऐवजांमध्ये होणारे बदल, शिक्षण, आरोग्य, आर्थिक मदत आणि इतर कल्याणकारी योजनांची माहिती तपशीलवार दिली. मॉडेल डिग्री कॉलेज प्राचार्य व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. डांगे यांनी १८ वर्षाखालील तृतीयपंथीय बालकांचाही ङ्कबालङ्क या श्रेणीत समावेश असल्याचे सांगून अशा बालकांसाठी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तृतीयपंथीयांच्या विकासासाठी जिल्हा प्रशासन कायम पाठिशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण निरीक्षक गीता केदार यांनी केले. त्यांनी तृतीयपंथीय हक्क अधिनियम २०१९ मधील प्रमुख कायदेशीर तरतुदी, हक्क संरक्षण, शासनाच्या जबाबदाऱ्या आणि तृतीयपंथीयांना मिळणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. समाजातील भेदभाव, अपमानास्पद वर्तन, तसेच तृतीयपंथीयांना येणाऱ्या दैनंदिन अडचणींचा विशेष उल्लेख करून समाजमान्यता आणि समान संधी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात तृतीयपंथीय प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले. तृतीयपंथीय तक्रार निवारण समितीचे सदस्य सनावर कुरेशी यांनी शासनाने दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. अमरसिंग राठोड (आम्रपाली) यांनी समाजाकडून मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे अनुभव सांगत, आजचा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होत असल्याने मिळालेल्या सन्मानाबद्दल समाधान व्यक्त केले. मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहातील




विद्यार्थी रोशन गवई यांनी सर्व नागरिकांना समान हक्क व अधिकार आहेत, तृतीयपंथीयही त्याला अपवाद नाहीत, मानवता हाच खरा धर्म असल्याचे सांगत संवेदनशीलतेचे आवाहन केले. कार्यक्रमामध्ये पोस्टर डिझाईनिंग स्पर्धा घेण्यांत आली. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. पुजा शिंगने, व्दितीय क्रमांक स्नेहल तायडे व तृतीय क्रमांक शितल अनिल माने या यशस्वी उमेदवारांना बक्षिसे वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी पुजा शिगणे यांनी केले.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अनुदानासाठी ई-केवायसी अनिवार्य

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यामध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात शासन स्तरावरून केंद्रभूत पद्धतीने थेट लाभार्थी हस्तांतरण() प्रणालीमार्फत अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, अनेक पात्र शेतकरी लाभार्थ्यांनी आपले ई-केवायसी पूर्ण न केल्यामुळे त्यांचे अनुदान वितरित होऊ शकलेले नाही. अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असून, ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा केली जाणार आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी तातडीने जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन आपले ई-केवायसी पूर्ण करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक रक्कम / गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक सनदीची आवश्यकता नाही-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची माहिती

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र जमीन महसूल संहितामध्ये सुधारणा करून अकृषिक परवानगीच्या सनदेच्या आवश्यकतेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे. यासाठी काही कालावधी लागणार असून ही कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत एखाद्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक वापराकरीता सनद घेण्याची आवश्यकता राहणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. याबाबत महसूल विभागाने शासन परिपत्रक जारी केला आहे. या शासन परिपत्रकानुसार ज्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा आहे त्यांनी सक्षम नियोजन प्राधिकरणाकडून विकास परवानगी घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर केल्यानंतर त्यांची एक प्रत संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यासाठी सादर करावी. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी अधिकार अभिलेखात नोंद घेऊन अधिकार अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही यथाशीघ्र पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागद्वारे सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांपैकी व्यवसाय सुलभता हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिझनेस) या उपक्रमाचा उद्देश भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अनुकूल व्यवसाय परिसंस्था निर्माण करणे हा असून यासाठी विविध सुधारणात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. या सुधारणा व्यवसाय सुधारणा कृती आराखड्चा भाग म्हणून राबवल्या जातात. व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहितातील कलमान्वये जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. परंतु, या तरतुदींनुसार जमीनधारकांना मानीव अकृषिक वापराची सनद घेणे आवश्यक असून त्यासाठी करावी लागणारी कार्यवाही व वेळ हा जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता लागणाऱ्या परवानगी एवढाच लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,




१९६६ मध्ये सुधारणा करुन अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याचे शासनस्तरावर प्रस्तावित आहे. वास्तव, महाराष्ट्र जमीन महसूल संहितामध्ये सुधारणा करुन शासनस्तरावरील अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने, एखाद्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक सनदेची आवश्यकता नसल्याबाबत दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार राज्य शासनाच्या महसूल विभागाने हे शासन परिपत्रक जारी केल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.




## सहकार विद्या मंदिर, बुलढाणाच्या कॅडेट्स ची चमकदार कामगिरी

जनसंचलन/बुलढाणा

संरक्षण मंत्रालयाचा भाग असलेल्या १३ महाराष्ट्र बटालियन एन.एन.सी. खामगांव येथे दि.१०/११/२०२५ ते १९/११/२०२५ या कालावधीत एन.सी.सी. वार्षिक कंबाईन ॲनवल ट्रेनिंग कॅम्प आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण अमरावती ग्रुप मधून ४०० कॅडेट्स विविध शाळा, कॉलेजेस मधून या कॅम्प मध्ये सहभागी झाले होते. सहकार विद्या मंदिर, बुलढाणाचे ४० एन.सी.सी. कॅडेट या कॅम्प मध्ये सहभागी झाले होते. सदर कॅम्प कालावधीत कॅडेट्स यांना इंडियन आर्मीच्या सानिध्यात शस्त्र प्रशिक्षण, मॅप रिडींग, ड्रील, हेल्थ ॲन्ड हायजिन, प्रथमोपचार, खामगांव स्थित औद्योगिक वसाहतीतील विविध कारखान्यांना भेट, आपती व्यवस्थापन, फायर फायटिंग इ. विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. जवळपास सर्वच स्पर्धा प्रकार व प्रतियोगितामध्ये सहकारच्या कॅडेट्स नी विविध मेडल व ट्रॉफी प्राप्त करुन अव्वल नामांकन प्राप्त केले.




सहकार विद्या मंदिरच्या कॅडेट्सला ०७ गोल्ड व १३ सिल्वर मेडल व ०३ संयुक्तीक ट्रॉफी मिळाल्या. विजेत्यांना १३ महाराष्ट्र बटालियन चे कमांडिंग ऑफिसर कर्नल ओमेश शुक्ला यांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. रिसालदार मेजर दिनेश कुमार, सुभेदार सचिन बोधे, इंस्टक्टर शंकर सर, शाम जामोदे यांनी कॅम्प यशस्वी होण्याकरीता अथक परीश्रम घेतले. संस्थेच्या अध्यक्षा सौ.कोमल झंवर यांनी यशस्वी विद्याथ्र्याचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, मुख्यध्यापीका व एन.सी.सी. ऑफीसर राजु हिवाळे यांना दिले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८